## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## पुणे विभागीय मंडळ,पुणे-४

संदर्भ-कमांक रा.मं./परीक्षा-२/१८४० दिनांक ०१/०५/२०२६.

कमांक पुविमं/शाखा-ब -गोपनीय/३५४४ दिनांक :-०२/०५/२०२६.

### परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे पुणे,अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्यातील सर्व मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रू-मार्च २०२६ परीक्षेचा ऑनलाईन निकाल शनिवार दिनांक ०२ मे २०२६ रोजी मंडळामार्फत ऑनलाईन जाहीर करण्यात आला असून लगेचच रविवार दिनांक ०३ मे २०२६ पासून विद्यार्थ्यांना गुणपडताळणी,उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती व पुनर्मुल्यांकन यासाठी अर्ज करण्याची सोय मंडळामार्फत दिनांक १७/०५/२०२६ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पुनर्मुल्यांकन प्रक्रिया ही आपणा सर्वांना अवगत आहेच व ती प्रचलित पध्दतीप्रमाणे ती कार्यरत आहे.

अ) ऑनलाईन निकालानंतर गुणपडताळणी , उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती,पुनर्मुल्यांकन यासाठी ऑनलाईन अर्ज स्किारण्यात येणार असून यासाठी https://mahahsscboard.in या संकेतस्थळावर सर्व माहिती ,अटी,शर्ती व सूचना देण्यात आलेल्या आहेत.या प्रक्रियेसाठी विहित शुल्क Debit Card/Credit Card/Upi/Net Banking या द्वारे ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे.

ब) गुणपडताळणीसाठी रविवार दिनांक ०३ मे २०२६ ते रविवार दिनांक १७/०५/२०२६ पर्यंत विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.गुणपडताळणीसाठी प्रति विषय रू.५०/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने मंडळाकडे जमा करावे लागेल.

क) फेब्रू-मार्च २०२६च्या परीक्षेतील विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मागणीसाठी १)ई-मेलद्वारे/संकेतस्थळावरून २) हस्तपोहोच ३) रजिस्टर पोस्टाने यापैकी एका पर्यायाची निवड करता येईल व त्यांनी केलेल्या पध्दतीने छायाप्रती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी या विभागीय मंडळाकडे रविवार दिनांक ०३/०५/२०२६ ते रविवार दिनांक १७/०५/२०२६ पर्यंत विहित नमुन्यात उपरोक्त संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील.उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी प्रति विषय रू.४००/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने मंडळाकडे जमा करावे लागेल.

ड) फेब्रू-मार्च २०२६ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्यांच्या दिवसापासून त्यापुढील

कार्यालयीन कामकाजाच्या पाच दिवसात पुनर्मुल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करून विहित नमुन्यात प्रति विषय रू.३००/- प्रमाणे शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरुन या विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

ई) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणाऱ्या माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्य ज्ञान (जी.के) या विषयांच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करून देण्यात येणार आहे.त्यासाठी देखील उपरोक्त पध्दतीने ऑनलाईन अर्ज करणे व ऑनलाईन शुल्क भरणे आवश्यक राहील.

फेब्रू-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल माहे मे-२०२६ मध्ये म्हणजे शनिवार दिनांक ०२/०५/२०२६ रोजी जाहीर झाला आहे.व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्या आहे तेव्हा परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे आवश्यक असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसात पुनर्मुल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा असल्याने कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अभिप्राय सादर करावयाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना सदर कामासाठी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक उपलब्ध राहतील अशी व्यवस्था आपण करावी विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची नोंद घ्यावी.

पुनर्मुल्यांकन करण्यासाठीच्या अटी शर्ती व सूचना मंडळाच्या https:// mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

MBRaut
2.5.26
(डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

**प्रत माहितीसाठी**

**१.मा.शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग पुणे**

**२.शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे-अहिल्यानगर-सोलापूर**